जावक क्र -७७६/२०२१
डेक्कन पोलीस स्टेशन , पुणे शहर
दिनांक — २३/१०/२०२३

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकरी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
यांना सविनय सादर,
प्रतिवेदक :- जी. एम. मोरे, पोलीस उप-निरीक्षक, डेक्कन पोलीस स्टेशन पुणे शहर.

विषय :- डेक्कन पोलीस स्टेशन,अ.म.र.नं.३६/२०२३ मधील अनोळखी पुरुष मयत इसमाचे वारसाचा शोध होणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वे सविनय सादर की, डेक्कन पोलीस स्टेशन अकस्मात मयत क्र. ३६/२०२३ सी.आर.पी.सी १७४ मधील रीपोर्टर सहा. पोलीस फौजदार एस. एम. पारगे, हे बालगंधर्व पोलीस चौकी, दिवसापाळी ड्युटी अमंलदार कर्तव्यास हजर असताना त्यांना १७.३० वा. सुमारास खबर देणार ठाणे अमंलदार, डेक्कन पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी कळविले की, पेशंट नामे ‘अनोळखी इसम’ वय अंदाजे ३९ वर्षे, रा. ‘माहित नाही’, हा दिनांक १३/१०/२०२३ रोजी १३.०० वा. अत्यवस्थ अवस्थेत धोंडुमामा होमिओपॅथी मेडिकल, कर्वेरोड, एरंडवणे, पुणे समोर आढळून आला होता. उपचार कामी त्यास ससुन हॉस्पीटल पुणे येथे डॉ प्राजक्ता यांनी वार्ड क्र १८ मध्ये अॅडमिटे केले होते. त्याचा एम. एल. सी. नं २५५६५/२०२३ असा आहे. ~~आज रोजी~~ दि. २१/१०/२०२३ रोजी ०३.०० वा. उपचारा दरम्यान डॉक्टरांनी सदर इसमास मयत घोषीत केले. त्याचे एम. एल. पी. एम. नं ६४०४/२०२३ अन्वये ससुन हॉस्पीटल येथे पोस्टमॉर्टम होऊन अॅडव्हान्स सर्टिफिकेट मिळाले आहे. या प्रमाणे अकस्मात मयत दाखल आहे. अनोळखी पुरुष मयत इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे

एक पुरुष जातीचे, वय अंदाजे ३९ वर्ष, नाव-पत्ता माहित नाही, रंगाने गोरा, उंची ५ फुट ६ इंच, डोळे अर्धवट उघडे, तोंड अर्धवट उघडे, मानेवर उजव्या बाजूस तीन स्टारचे टॅटू त्याच्या कडा काळया रंगाचे व आतील बाजूस लाल रंगाचे, डाव्या छातीवर बदाम आकाराचे टॅटू कडेला नक्षी, बदामामध्ये इंग्रजी डी अक्षर, गळ्यामध्ये स्टीलची पांढऱ्या रंगाची चैन, डाव्या हाताच्या मनगटावर महाकाल असे मराठीत गोंदन, तसेच नक्षीदार टॅटू, तसेच डाव्या हाताच्या पंजावर स्टार व बदाम असलेले टॅटू, उजव्या हातामध्ये तांब्याचे धातूचे कडे, तसेच दोन राख्या व काळा दोरा व पंजाखाली मनगटावर ए.एस. असे इंग्रजी गोंदन.

येणेप्रमाणे आपलें हददीत वरील वर्णनाचे पुरुष जातीचे मयताचे वारसाचा आपलेकडील स्टाफमार्फत शोध होवुन त्याचा परिणाम उलटटपाली रिपोर्टाने इकडील कार्यालयात पाठविणेस विनंती तसेच आपले पोलीस स्टेशनकडील मिसींग रजिस्टर पडताळणी होणेस विनंती आहे.

मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
डेक्कन पोलीस स्टेशन पुणे
यांचे मार्फत रवाना

Khawale
3983
पोलीस ठाणे अंमलदार
डेक्कन पोलीस ठाणे,पुणे

मा.सादर व्हावे
ता. २३/१०/२०२३

(जी. एम. मोरे,)
पोलीस उप-निरीक्षक
डेक्कन पोलीस स्टेशन पुणे.